# नमुना दोन

जाक्र ठाजिप/शिक्षण/प्राथ/प्रास-२/वशी - 30909/23
शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प. ठाणे
दिनांक :- 07/11/2023

प्रति,

व्यवस्थापक:- दयानंद एंग्लो वैदिक कॉलेज ट्रस्ट ॲण्ड मॅनेजमेन्ट सोसायटी
दुरध्वनी : ०२२-२७७१४०१७
ई मेल :- davnerul@gmail.com

विषय: - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ :- शिक्षणाधिकारी नवीमुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग नवीमुंबई यांचेकडील जाक्र.नमुंमपा/शि.वि./ १९३८/२०२३ दि.४/९/२०२३ रोजीचा पडताळणी सूचीसह प्रस्ताव.

आपल्या दिनांक ४/९/२०२३ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला/ पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद ठाणे दि.**१/४/२०२२** पासुन ते **दिनांक ३१/३/२०२५** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इ.१ ली ते इ. ८ वी** करिता डि.ए.व्ही. पब्लिक स्कुल, प्लॉट नं.३४, सेक्टर ४८, नेरुळ नवीमुंबई जि.ठाणे (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११(जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना ,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निदिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांक/ विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या-:

| | |
|---|---|
| * शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | :- १०८९०.१७ चौ.मी. |
| * एकुण बांधकाम क्षेत्र | :- ४०००.१७ चौ.मी. |
| * खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :- ६८९० चौ.मी. |
| * वर्ग खोल्या संख्या | :- ४८ |
| * कार्यालय- नि-भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली | :- १५ |
| * मुलांसाठी व मुलींसाठीह स्वतंत्र प्रसाधनगृहे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- | :- आहे |
| * पिण्याच्या पाण्याची सुविधा | :- आहे |
| * दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | :- लागू नाही |
| * अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता | :- आहे |
| * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. | :- आहे |

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक TH- NMMC-P- 29 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

२०. मुख्याध्यापक डि.ए.व्ही. पब्लिक स्कुल, प्लॉट नं.३४, सेक्टर ४८, नेरुळ नवीमुंबई जि.ठाणे यांनी त्यांच्या शाळेस आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर-२ मिळणेबाबत प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रकांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवल्यास अथवा खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रक आढळून आल्यास या कार्यालयाकडुन देण्यात आलेले आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर २- रद्द समजण्यात येईल.

(डॉ.भाऊसाहेब कारेकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद ठाणे